# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website: www.barti.in E mail: dg@barti.in


जा.क्र.बार्टी/JEE-NEET/२०२६ – २०२७/५७००

दिनांक १७/०८/२०२६

## घोषणापत्र

## जेईई (JEE) व नीट (NEET) सन २०२६-२८ पूर्व प्रशिक्षण शुद्धीपत्रक

जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण सन २०२६-२७ करीता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी दिनांक ०७/०८/२०२६ रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. दिनांक १३/०८/२०२६ च्या प्रसिद्ध घोषणापत्रान्वये विद्यार्थ्यांचे मूळ कागदपत्र पडताळणीसाठी वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर घोषणापत्रातील मुद्दा क्रमांक ७ अन्वये विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्र प्रशिक्षणास पूर्ण वेळ उपस्थित राहण्याबाबत तसेच परीक्षा देणेबाबत ५०० रु. स्टॅम्प पेपर आणण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

दिनांक १३/०८/२०२६ प्रसिद्ध घोषणापत्रातील **मुद्दा क्रमांक ७ मधील शपथपत्र पालकांच्या स्वाक्षरीने सादर करावे** सदर शपथ पत्राचा मसुदा सोबत जोडण्यात आला आहे याची सर्व विद्यार्थी तसेच पालकांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

( दीपा मुधोळ -मुंडे)

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे**

## विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी शपथपत्र/प्रतिज्ञापत्र

मी लिहून देणार ________________________________________________

माझा मुलगा/मुलगी_____________________________________________

पत्ता_______________________________________________________

मोबाईल क्र._________________________असे शपथ पूर्वक लिहून देतो/देते की,

१. माझ्या मुलाची/मुलीची जेईई/ नीट या प्रशिक्षणासाठी सन २०२६-२०२८ या वर्षाकरिता निवड झाली आहे.
२. मी या शपथपत्राद्वारे असे घोषित करतो/ करते की माझा मुलगा/मुलगी सन २०२६-२०२८ या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे अंतर्गत मी प्रवेश घेतलेल्या पॅनलवरील संस्थेमध्ये प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणासाठी पूर्णवेळ उपस्थित राहील. जर माझा मुलगा/मुलगी प्रशिक्षण कालावधीत सलग १० दिवसांपेक्षा जास्त किंवा सतत अनुपस्थित राहिल्यास त्याची निवड नियमानुसार रद्द करण्यात येईल.
३. जर माझा मुलगा/मुलगी जेईई/नीट सन २०२६-२०२८ या प्रशिक्षणाचा पूर्ण लाभ घेतल्यानंतर जेईई/नीट च्या परीक्षेसाठी बसला नाही तर माझ्या मुलाच्या/मुलींच्या प्रशिक्षणावर झालेला पूर्ण खर्च मला बार्टी संस्थेस परत करावी लागेल याची मला पूर्ण कल्पना आहे.
४. माझा मुलगा/मुलगी जेईई व नीट च्या प्रशिक्षणासाठी पूर्ण वेळ उपस्थित राहील, तसेच जेईई/नीट परीक्षा देणे बंधनकारक आहे हे मला मान्य आहे.

वरील मजकूर / माहिती सत्य असून मी स्वतः लिहून देत आहे.

शपथपत्र लिहून देणाऱ्या पालकाची स्वाक्षरी :

शपथपत्र लिहून देणाऱ्या पालकाचे नाव:

सत्यापन

वरील सर्व मजकूर मी पूर्णपणे वाचला आहे व तो मला मान्य आहे. तथापि मी आज दि. / /२०२६ रोजी स्थळ ______________________ येथे प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.